प्रकरण I

प्रस्तावना

1.1 या अहवालासंबंधी

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थां यांच्या खर्चाच्या अनुपालन लेखापरीक्षणातून निदर्शनास आलेल्या प्रकरणांशी संबंधित आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निर्देशांतर्गत कार्यालय, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई आणि कार्यालय, महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर त्यांच्या अधिकारक्षेत्राअंतर्गत येणारे विविध शासकीय विभाग आणि कार्यालये, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम (लेखापरीक्षीत संस्था) यांचे लेखापरीक्षण करतात. **तक्ता 1.1** मध्ये दाखविल्याप्रमाणे प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा-II), नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात प्रत्येकी आठ समुह येतात.

तक्ता 1.1: लेखापरीक्षण अधिकारक्षेत्रांची समुह-निहाय विभागणी

अ. क्र.	प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे समुह	महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे समुह
1	आरोग्य व कल्याण	ऊर्जा व शक्ती
2	शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार	उद्योग व वाणिज्य
3	ग्रामीण विकास	वाहतूक
4	कृषी, अन्न आणि संबंधित उद्योग	पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान
5	जल संपदा	सार्वजनिक बांधकाम
6	नगर विकास	वित्त
7	संस्कृती व पर्यटन	माहिती तंत्रज्ञान व संचार
8	सामान्य प्रशासन	कायदा व सुव्यवस्था

या कार्यालयाने लेखापरीक्षण केलेल्या विभागांची, स्वायत्त संस्थांची आणि सार्वजनिक उपक्रमांची समुह निहाय यादी खालील **तक्ता 1.2** मध्ये दर्शविली आहे आणि तपशील ***परिशिष्ट 1.1*** मध्ये दिला आहे.

तक्ता 1.2: या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केलेले समूह-निहाय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम

समूहाचे नाव	विभागांची संख्या	स्वायत्त संस्थांची संख्या	सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची संख्या
ऊर्जा आणि शक्ती	1	2	8
उद्योग आणि वाणिज्य	1	1	29
वाहतूक	2	1	6
पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान	2	3	4
सार्वजनिक बांधकाम	2	1	16
वित्त*	2	-	4
माहिती तंत्रज्ञान व संचार	1	-	1
कायदा व सुव्यवस्था	2	2	1
एकूण	**13**	**10**	**69**

** या अहवालात वित्त समूहाचा समावेश नाही*

हा अहवाल महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात समूहामध्ये 11 विभाग आणि दहा स्वायत्त संस्थांमधील निवडक युनिटच्या खर्चाच्या लेखापरीक्षणातून निदर्शनास आलेल्या लेखापरीक्षण निरीक्षणांशी संबंधित आहे. महसूल क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वित्त समूहाच्या लेखापरीक्षणावरील आणि वाणिज्यिक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांच्या लेखापरीक्षणावरील लेखापरीक्षण निरीक्षणे स्वतंत्र अहवालांद्वारे स्वतंत्रपणे नोंदवली जात आहेत.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा मुख्य उद्देश आहे. लेखापरीक्षण मानकांनुसार अहवाल देण्याच्या गुणवत्तेचा स्तर हा व्यवहारांचे स्वरूप, व्याप्ती आणि परिमाण यांच्याशी सुसंगत असायला पाहिजे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती तसेच धोरणे व निर्देश तयार करण्यास सक्षम करणे अपेक्षित आहे, ज्यामुळे संस्थांची कार्यक्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारले जाईल. अशाप्रकारे, चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

1.2 लेखापरीक्षीत घटकांची रुपरेखा

राज्यातील सचिवालय स्तरावरील विभागांचे प्रमुख, अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव असतात आणि त्यांना संचालक/आयुक्त आणि अधिनस्थ

अधिकारी सहाय्य करतात. मागील वर्षाच्या तुलनेत वर्ष 2023-24 मधील राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश **तक्ता 1.3** मध्ये दिला आहे.

तक्ता 1.3: 2022-23 च्या तुलनेत 2023-24 मधील राजकोषीय व्यवहारांचा सारांश

(*₹ कोटी मध्ये*)

प्राप्ती	2022-23	2023-24	संवितरण	2022-23	2023-24
विभाग-अ: महसूल खाते					
महसूली जमा			महसूली खर्च		
स्वतःचा कर महसूल	2,77,486.31	3,02,343.37	सामान्य सेवा	1,30,590.81	1,39,874.71
करेतर महसूल	16,776.41	20,857.94	सामाजिक सेवा	1,63,329.16	1,89,224.05
केंद्रीय कर/ शुल्कांचा वाटा	60,000.97	71,349.75	आर्थिक सेवा	80,819.94	83,363.03
भारत सरकार कडून सहायक अनुदान	51,414.24	36,045.40	सहायक अनुदान आणि योगदान	32,874.49	31,888.67
एकूण विभाग-अ महसूल जमा	**4,05,677.93**	**4,30,596.46**	**एकूण विभाग-अ महसूल खर्च**	**4,07,614.40**	**4,44,350.46**
विभाग-ब: भांडवली खाते आणि अन्य					
विविध भांडवली प्राप्ती	0	0	भांडवली परिव्यय	61,643.61	72,573.40
			सामान्य सेवा	3,526.56	5,579.89
			सामाजिक सेवा	9,134.20	15,243.68
			आर्थिक सेवा	48,982.85	51,749.83
कर्ज आणि अग्रिमांची वसुली	642.62	742.20	कर्ज व अग्रिमे संवितरीत	4,664.41	4,974.16
लोक ऋण जमा	87,572.84#	1,25,820.67@	लोक ऋणाची परतफेड	37,665.79#	40,649.98@
आकस्मिक निधीतून विनियोग	200.00	0.00	आकस्मिक निधीतून विनियोग	200.00	0.00
आकस्मिक निधी	200.00	0.00	आकस्मिक निधी	200.00	0.00
लोक लेखे जमा	1,43,466.93	1,36,495.89	लोक लेखा संवितरण	1,21,973.69	1,23,351.19
सुरुवातीची रोख शिल्लक	77,692.29	81,490.71	अंतीम शेष रोख	81,490.71	89,246.74
एकूण विभाग ब प्राप्ती	**3,09,774.68**	**3,44,549.47**	**एकूण विभाग ब वितरण**	**3,07,838.21**	**3,30,795.47**
एकूण एकूण (A+B)	**7,15,452.61**	**7,75,145.93**	**एकूण अनुदान (अ+ब)**	**7,15,452.61**	**7,75,145.93**

@ विशेष आहरण सुविधेअंतर्गत 91 दिवसांचे व्यवहार वगळून (₹ 166.85 कोटींची प्राप्ती आणि वितरण)
# विशेष आहरण सुविधेअंतर्गत 91 दिवसांचे व्यवहार वगळून (₹ 7,129.25 कोटींची प्राप्ती आणि वितरण)

(स्रोत: संबंधित वर्षांचे वित्त लेखे)

1.3 लेखापरीक्षणासाठी प्राधिकार

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना भारतीय संविधानाच्या कलम 149 व 151 आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 अन्वये लेखापरीक्षण करण्याचे प्राधिकार प्राप्त झाले आहेत.

कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती अधिनियमाच्या तरतुदी आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्गमीत केलेल्या लेखापरीक्षण व लेखा नियमन, 2020 अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम यांचा खर्च व जमा यांचे लेखापरीक्षण नियंत्रक व महालेखापरीक्षक करतात.

1.4 लेखापरीक्षणाचे नियोजन व आयोजन

लेखापरीक्षण प्रक्रियेची सुरुवात लेखापरीक्षीत घटकांची जोखीम जसे की झालेला खर्च व प्राप्त महसूल, समीक्षणात्मक/गुंतागुंतीची कार्ये, प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची पातळी, लेखापरीक्षण धारणा, एकंदर अंतर्गत नियंत्रणाचे मूल्यांकन, भागधारकांच्या चिंता आणि लेखापरीक्षण निरीक्षणांचा मागील कल यांच्या मूल्यांकनाच्या आधारावर वार्षिक लेखापरीक्षा योजना तयार करण्यापासून होते. वरील मानकानुसार विविध विभागांतर्गत असलेल्या युनिटचे उच्च, मध्यम आणि कमी जोखीम असलेल्या युनिट्समध्ये वर्गीकरण केले आहे. या जोखिम मूल्यांकनाच्या आधारावर, लेखापरीक्षणाची वारंवारता आणि व्याप्ती ठरवली जाते.

प्रत्येक युनिटचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर, लेखापरीक्षण निष्कर्षांचा समावेश असलेले निरीक्षण अहवाल तपासणी केलेल्या कार्यालय प्रमुखांना पाठविले जातात. निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखापरीक्षण निष्कर्षांना उत्तरे देण्याची विनंती केली जाते. उत्तरे प्राप्त झाल्यानंतर लेखापरीक्षण निष्कर्ष एकतर निकाली काढले जातात किंवा अनुपालनासाठी पुढील कारवाईचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालामधून उद्‌भवणारी महत्त्वपूर्ण निरीक्षणे भारतीय संविधानाच्या कलम 151(2) अंतर्गत राज्यपालांना सादर करण्यात येणा-या लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट करण्यासाठी संस्करीत केल्या जाते.

1.5 लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद

1.5.1 प्रलंबीत निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची नियतकालिक लेखापरीक्षण तपासणी ही त्यांनी केलेल्या व्यवहारांची चाचणी तपासणी आणि विहित नियम व कार्यपद्धतीनुसार महत्त्वपूर्ण लेखे व इतर अभिलेखे ठेवल्याची पडताळणी करण्यासाठी केली जाते. या तपासणी पाठोपाठ निरीक्षण अहवाल तयार करुन कार्यालय प्रमुखांना, त्याच्या प्रती पुढील उच्च प्राधिकाऱ्यांसह,

निर्गमीत केला जातो. निरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षण निरीक्षणांवर केलेल्या कारवाईवर नियंत्रण ठेवण्याकरिता प्रलंबित निरीक्षण अहवालांची अर्धवार्षिक तपशीलवार विवरणे संबंधित विभागांच्या सचिवांना पाठविली जातात.

जून 2024 पर्यंत, 2255 निरीक्षण अहवाल (10,395 परिच्छेद) निपटाऱ्यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल व परिच्छेदांचे वर्ष-निहाय तपशील ***परिशिष्ट 1.2*** मध्ये दर्शविले आहेत. यावरून असे दिसून येते की प्रलंबीत लेखापरीक्षण मुद्द्यांचे निराकरण करण्यासाठी वेळेवर आणि प्रभावी पावले उचलली जात नाहीत.

1.5.2 विभागीय लेखापरीक्षण समिती

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व प्रशासकीय विभागांना लेखापरीक्षा समिती स्थापन करण्याचे, प्रलंबित निरीक्षण अहवाल व परिच्छेदांचे पुनरावलोकन करण्याचे आणि त्यांच्या निपटाऱ्याकरिता त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत (डिसेंबर 1985). स्थापन केलेल्या अशा प्रत्येक समितीमध्ये प्रशासकीय विभाग, लेखापरीक्षा यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी आणि लेखापरीक्षीत संस्थेच्या विभाग प्रमुखांसह, वित्त विभागातील एक नामनिर्देशित व्यक्ति असेल. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार या पदापेक्षा कमी नसलेले अधिकारी, प्रतिनिधी म्हणून लेखापरीक्षा समितीचे सदस्य असतात. प्रत्येक तिमाहीत किमान एकदा लेखापरीक्षा समितीची बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

2023-24 दरम्यान, **तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे नऊ लेखापरीक्षण समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या.

तक्ता 1.4: 2023-24 मध्ये आयोजित केलेल्या लेखापरीक्षा समिती बैठका

अनुक्रमांक	प्रशासकीय विभागाचे नाव	आयोजीत केलेल्या एसीएमची संख्या	निपटारा केलेल्या आयआरची संख्या	निपटारा केलेल्या परिच्छेदांची संख्या
1	सार्वजनिक बांधकाम विभाग	4	0	563
2	ऊर्जा	3	5	86
3	उद्योग	2	15	63
एकूण		**9**	**20**	**712**

तक्ता 1.4 वरून स्पष्ट होते की, या अहवालात समाविष्ट असलेल्या महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखापरीक्षण अधिकारक्षेत्रातील 11 प्रशासकीय विभागांपैकी, 2023-24 दरम्यान केवळ तीन प्रशासकीय विभागांनी बैठका घेतल्या.

1.5.3 प्रारुप परिच्छेद आणि अनुपालन लेखापरीक्षणांना विभागांचा प्रतिसाद

या अहवालात दिसणारे पाच प्रारुप परिच्छेद, एक विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण आणि एक माहिती तंत्रज्ञान (आयटी) लेखापरीक्षण फेब्रुवारी 2025 ते ऑक्टोबर 2025 या कालावधीत संबंधित विभागांच्या प्रधान सचिव/सचिवांना अर्ध-शासकीय पत्राने चार आठवड्यांच्या आत प्रतिसाद देण्याच्या विनंतीसह पाठवण्यात आले. चार मसुदा परिच्छेदांची उत्तरे प्राप्त झालेली नाहीत.

1.5.4 लेखापरीक्षण अहवालाचा पाठपुरावा

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जानेवारी 2001 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, प्रशासकीय विभागांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात, लेखापरीक्षणाद्वारे सत्यापित केलेले स्पष्टीकरणात्मक ज्ञापन, लेखापरीक्षण अहवाल राज्य विधानमंडळास सादर केल्यापासून तीन महिन्यांच्या आत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे प्रस्तुत करणे आवश्यक होते. मात्र, प्रशासकीय विभागांनी या सूचनांचे पालन केले नाही. वर्ष 2015-16 ते 2021-22 मधील प्रलंबीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. समुहनिहाय तपशील ***परिशिष्ट 1.3*** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.5: 2015-16 ते 2021-22 च्या लेखापरीक्षण अहवालांच्या प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याची तारीख	परिच्छेद आणि समिक्षांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	शिल्लक
2015-16	11 ऑगस्ट 2017 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	7	7	0
	7 एप्रिल 2017 (पीएसयू)	7	7	0
2016-17	28 मार्च 2018 (ईएस)	2	2	0
	20 जुलै 2018 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	4	4	0
	20 जुलै 2018 (पीएसयू)	8	8	0

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याची तारीख	परिच्छेद आणि समिक्षांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	शिल्लक
2017-18	2 जुलै 2019 (ईएस)	4	3	1
	4 मार्च 2020 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	4	4	0
	4 मार्च 2020 (पीएसयू)	7	7	0
2018-19	08 सप्टेंबर 2020 (ईएस)	4	4	0
	08 सप्टेंबर 2020 (पीएसयू)	2	2	0
2019-21	04 ऑगस्ट 2023 (अनुपालन लेखापरीक्षण)	7	7	0
2021-22	18 जुलै 2025 (अनुपालन लेखापरीक्षण)	2	0	2
एकूण		**58**	**55**	**3**

टीप: ईएस-आर्थिक क्षेत्र अहवाल: आरएस-महसूल क्षेत्र; पीएसयू-सार्वजनिक क्षेत्र उपक्रम

तक्ता 1.5 वरून हे निदर्शनास येते की लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या 58 परिच्छेदांपैकी, 2015-16 ते 2021-22 या कालावधीत 55 परिच्छेदांसाठी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्राप्त झाले.

लोक लेखा समिती (पीएसी) आणि सार्वजनिक उपक्रम समिती (सीओपीयु) प्रत्येक प्रकरणात, लेखापरीक्षण अहवालांमध्ये हाताळलेल्या सर्व मुद्द्यांवर कार्यकारी मंडळाची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी विभागांनी त्यांच्या शिफारसींवर कारवाई केलेली टिप्पण्णी (एटीएन) पाठविण्याचा कालावधी निश्चित करतात.

2015-16 ते 2023-24 दरम्यान पीएसी आणि सीओपीयु यांनी 2010-11 ते 2015-16 या वर्षांच्या लेखापरीक्षण अहवालांशी संबंधित 144 परिच्छेदांवर चर्चा केली. पीएसी आणि सीओपीयु यांच्या शिफारशींवर प्रतिक्षीत असलेल्या एटीएन (जून 2024) ची स्थिती **तक्ता 1.6** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.6: पीएसी/कोपु शिफारशींवरील कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रलंबित स्थिती

वर्ष	लेखापरीक्षण अहवाल	पीएसी/ कोपु अहवाल क्रमांक	पीएसी/ कोपुचे चे वर्ष	पीएसी/ कोपु द्वारा शिफारसींची संख्या	प्रलंबित कारवाई केलेल्या टिप्पण्यांची संख्या
2010-11	पीएसयू	01	2020-21	06	06
		06,11,07	2015-16	05	05
2011-12	पीएसयू	05	2015-16	01	01
		18	2017-18	03	03
		06	2015-16	02	02

वर्ष	लेखापरीक्षण अहवाल	पीएसी/ कोपु अहवाल क्रमांक	पीएसी/ कोपुचे वर्ष	पीएसी/ कोपु द्वारा शिफारसींची संख्या	प्रलंबित कारवाई केलेल्या टिप्पण्यांची संख्या
	आरएस (वाहतूक)	33	2017-18	03	03
		34	2017-18	64	02
2012-13	ईएस	45,60	2017-18	26	18
	पीएसयू	06	2015-16	01	01
	आरएस (वाहतूक)	37	2017-18	06	06
2013-14	पीएसयू	07	2015-16	01	01
	आरएस (वाहतूक)	19	2015-16	09	07
2014-15	ईएस	43	2017-18	20	18
	जीएसएस	61	2017-18	13	12
	पीएसयू	02	2020-21	05	05
		18	2017-18	03	03
	आरएस	66	2017-18	05	05
2015-16	ईएस	39	2017-18	13	01
एकूण				**186**	**99**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, 11 विभागांकडून 99 एटीएन प्रतिक्षित होत्या. ज्या पीएसी आणि सीओपीयु शिफारशींवरील एटीएन प्रतिक्षित आहेत (जून 2024) त्यांची समुह-निहाय स्थिती ***परिशिष्ट 1.4*** मध्ये दर्शविली आहे.

1.6 लेखापरीक्षणाचे परिणाम

वर्षभरात केलेल्या स्थानिक लेखापरीक्षणाची स्थिती

2023-24 या वर्षात केलेल्या ऊर्जा, उद्योग, वाहतूक, वन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पर्यावरण आणि हवामान बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, माहिती तंत्रज्ञान, गृह, कायदा व विधी व्यवहार यांच्या 307 कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत 2503 निरीक्षणांमध्ये ₹ 11755.00 कोटींचे कमी मूल्यांकन/कमी आकारणी/ महसुलाची हानी, हे उघडकीस आले. वर्षभरात, 2023-24 मध्ये लेखापरीक्षणात निदर्शनास आणलेल्या 148 निरीक्षणांमध्ये संबंधित विभागांनी ₹ 667.95 कोटींचे कमी मूल्यमापन आणि इतर कमतरता मान्य केल्या. ***परिशिष्ट 1.5*** मध्ये दर्शविल्यानुसार विभागांनी 2023-24 आणि पूर्वीच्या वर्षांच्या लेखापरीक्षण निष्कर्षांशी संबंधित ₹ 33.71 कोटी, 2023-24 मध्ये गोळा केले.

या अहवालाचा समावेश

या अहवालाच्या प्रकरण II मध्ये 'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण' यावर विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण, माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षणावरील 'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' आणि स्थानिक लेखापरीक्षणादरम्यान केलेल्या लेखापरीक्षण तपासणीतून निवडलेल्या पाच लेखापरीक्षण परिच्छेदांचा समावेश आहे. हे पुढील प्रकरण II मध्ये चर्चिले आहे.